| | | | |
|---|---|---|---|
| MHAM180020802015 | दाखल दिनांक -<br>नोंदणी दिनांक -<br>निकाल दिनांक -<br>कालावधी - | | ०७/१२/२०१५<br>०७/१२/२०१५<br>२७/०७/२०२६<br>वर्ष महिने दिवस<br>१० ०७ २१ |

**नियमित फौ. प्रकरण क्र. : ३५६/२०१५** **नि.क्रमांक –३६**

**नमुना क्र. XXXII**
**भाग 'अ'**
**(न्यायनिर्णयाचे शिर्षपृष्ठ)**
**[फौजदारी नियमावली मधील प्रकरण VI मधील परिच्छेद 44(i)]**

**सह प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, वरूड, ता.- वरूड, जि.-अमरावती यांच्या न्यायालयात**
**(पिठासिन अधिकारी - आय.जे. ठाकरे)**

| | |
|---|---|
| निकाल तारीख : | २७/०७/२०२६ |
| नि. फौजदारी प्रकरण क्र. | ३५६/२०१५ |
| अपराध क्रमांक | ४५/२०१५ |
| पोलीस स्टेशन | बेनोडा, ता.वरूड, जि.-अमरावती |

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र सरकार तर्फे**<br>पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन बेनोडा, ता. वरूड, जि. अमरावती |
| **अभियोग पक्षातर्फे** | श्री. एम. ए. यावले, सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी** | **१) रिझवान करिम पठान,**<br>वय–५२ वर्ष, व्यवसाय–शेती,<br>**२) फिरोज खाँ चॉद खाँ पठाण,**<br>वय–४७ वर्ष, व्यवसाय–शेती,<br>दोघे रा.– रामकृष्ण कॉलनी, बेनोडा,<br>ता.–वरूड, जि. अमरावती. |
| **आरोपीतर्फे** | विद्वान विधिज्ञ श्री. एन. ए. कुरेशी |

## भाग 'ब'

## [फौजदारी नियमावली मधील प्रकरण VI मधील परिच्छेद 44(ii)]

| | |
|---|---|
| अपराधाचा दिनांक | २३/०६/२०१५ ते २९/०६/२०१५ |
| प्रथम खबरी दिनांक | १३/०७/२०१५ |
| दोषारोप पत्र दाखल दिनांक | ०७/१२/२०१५ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०४/०८/२०२५ |
| साक्षीदारांची पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ३०/०८/२०२५ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवलेला दिनांक | २७/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | २७/०७/२०२६ |
| शिक्षेसंबधीचा आदेशाचा दिनांक, जर असल्यास | — —— |

### आरोपीची माहीती

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जमानतीवर सोडल्याचा दिनांक | गुन्हयातील कलम | निर्दोष अथवा दोषी असल्याबाबत | दिलेली शिक्षा | कलम ४२८ करीता प्रकरण न्यायप्रविष्ठ असतांना कैदेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | रिझवान करिम पठान | १३/०७/१५ | १०/०८/१५ | भा.दं.वी. चे कलम ३७९ | **निर्दोष** | नाही | – -- |
| २) | फिरोज चॉद पठाण | | | | | | |

## भाग 'क'

## [फौजदारी नियमावली मधील प्रकरण VI मधील परिच्छेद 44(iii)]

## साक्षीदारांची यादी (अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयातर्फे)

### अ. अभियोग पक्ष

| अ. क्र. | नाव | साक्षीदाराचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी, पोलीस साक्षीदार, वैद्यकिय अधिकारी, पंच साक्षीदार) |
|---|---|---|
| सा. क्र.१ | संतोष सहदेवराव बारस्कर, (नि.क्र.१८) | जप्ती पंच |
| सा.क्र.२ | युवराज लक्ष्मणराव खंडारे, (नि.क्र.२२) | साक्षीदार |
| सा.क्र.३ | कैलास विठ्ठलराव चौधरी, (नि.क्र.२६) | साक्षीदार |
| सा.क्र.४ | धनराज नामदेवराव देशमुख, (नि.क्र.३०) | फिर्यादी/साक्षीदार |

## ब. बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यास

| अ.क्र. | नाव | साक्षीदाराचे स्वरुप<br>(प्रत्यक्षदर्शी, पोलीस साक्षीदार, वैद्यकिय अधिकारी, पंच साक्षीदार) |
|---|---|---|
| – – | निरंक | – -- |

## क. न्यायालयातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार, असल्यास

| अ. क्र. | नाव | साक्षीदाराचे स्वरुप<br>(प्रत्यक्षदर्शी, पोलीस साक्षीदार, वैद्यकिय अधिकारी, पंच साक्षीदार) |
|---|---|---|
| – – | निरंक | – – – |

## देण्यात आलेल्या निशाणींची यादी (अभियोग पक्ष/ बचाव पक्ष / न्यायालयातर्फे )

## अ. अभियोग पक्ष :

| अ.क्र. | निशाणी | विवरण |
|---|---|---|
| १) | सा.क्र.१ - नि.क्र.१९ | जप्ती पंचनामा |
| २) | सा.क्र.४ - नि.क्र.३१, ३२ | रिपोर्ट, छापील प्रथम खबर |

### ब. बचाव पक्ष :

| अ.क्र. | निशाणी | विवरण |
|---|---|---|
| – – | – – | – – |

## क. न्यायालयातर्फे :

| अ.क्र. | निशाणी | विवरण |
|---|---|---|
| – – | – – | – – |

## ड. मटेरियल ऑब्जेक्ट:

| अ.क्र. | मटेरियल ऑब्जेक्ट क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| – – | – – | – – |

**<u>दोषारोप</u> :– <u>भारतीय दंड संहिता कलम ३७९ सह कलम ३४ नुसार</u>**

## न्यायनिर्णय

(घोषित दिनांक – २७/०७/२०२६)

आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३७९ सह कलम ३४ खालील अपराध केल्याचा दोषारोप ठेवण्यात आलेला आहे.

प्रकरणाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे आहे.

२. आरोपी क्र.१ रिझवान करिम पठाण, व आरोपी क्र.२ फिरोज खाँ चाँद खाँ पठाण यांनी एकूण १३ ब्रास काळी व पांढरी अवैध रेती श्री. ढोबळे यांच्या खाली जागेवर साठवून ठेवली होती. त्याचा पंचनामा दि.२३/०६/२०१५ रोजी सुरेंद्र देशमुख नायब तहसिलदार यांनी केला होता. जप्त रेती सुपर्तनाम्यावर युवराज खंडारे, कोतवाल बेनोडा यांना देण्यात आली होती. आरोंपीनी जप्त रेती चोरी करून विक्री केल्या बाबत कोतलवाल युवराज यांनी नमूद केले आहे. त्यामुळे फिर्यादी धनराज, मंडळ अधिकारी, बेनोडा तहसिल यांनी आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन, बेनोडा येथे रिपोर्ट दिला. त्या रिपोर्टच्या आधारे अपराध क्र.४५/२०१५ नुसार वरील कलमांन्वये अपराध नोंदविण्यात आला. तपासा दरम्यान तपासी अधिकारी यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षीदारांची बयाने नोंदवली आणि प्रकरणात आवश्यक तो पुरावा हस्तगत करून आरोपीं विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

३. आरोपी हजर झाल्यानंतर त्याच्या विरुध्द नि.क्र.१५ वर भारतीय दंड संहिता कलम ३७९ सह कलम ३४ खालील अपराधाकरीता दोषारोप ठेवला. तो आरोपींना वाचून दाखविला असता त्यांनी अनुक्रमे निशाणी क्र.१६ व १७ वरील निवेदनात नाकबूल केला व संपरीक्षेची मागणी केली. अभियोग पक्षाचा पुरावा

नोंदविण्यात आला. सदर प्रकरणात आरोपींविरूध्द अपराधदर्शक पुरावा आढळून आल्याने त्याचे फौ.प्र.सं. चे कलम ३१३ (१)(ब) प्रमाणे बयान नोंदविण्यात आले असता आरोपींनी त्यांचे विरुध्द खोटे प्रकरण दाखल करण्यात आल्याचे कथन केले आहे.

**४.** दोन्ही पक्षांचे म्हणणे विचारात घेता खालील मुद्दे सदरचे प्रकरण निकाली काढण्याकरीता तयार केले. त्या मुद्दयांना खालील उत्तरे दिली आहे व त्याचे निष्कर्ष बाजूला दिलेले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, दिनांक २३/०६/२०१५ ते २९/०६/२०१५ दरम्यान तहसिल कार्यालय, वरूड येथुन जप्त केलेली १३ ब्रास रेती फिर्यादीच्या संमतीशिवाय अप्रामाणीकपणे चोरी केली आणि त्यायोगे त्यांनी भा.दं.वि. कलम ३७९ सह कलम ३४ प्रमाणे अपराध केला? | **नकारार्थी.** |
| २. | आदेश काय ? | **निर्दोष मुक्तता करण्यात येते** |

## कारणमिमांसा

**५.** अभियोग पक्षाने त्यांची बाजू सिध्द करण्याकरीता फिर्यादी सा.क्र.१, (नि.क्र.१८), व सा.क्र.२ युवराज, (नि.क्र.२२), व सा.क्र.३ कैलाश, (नि.क्र.२६) आणि सा.क्र.४ धनराज, (नि.क्र.३०) वर तपासले आहे. अभियोग पक्षास वारंवार संधी देऊन सुध्दा अभियोग पक्षातर्फे इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात न आल्याने नि.क्र.१ वर झालेल्या आदेशानुसार अभियोग पक्षाच्या पुराव्याची बाजू बंद करण्यात

आली.

**<u>मुद्दे क्र.१ व २ करीता</u>–**

६. सदर प्रकरणात अभियोग पक्षाने त्यांच्या खटल्याच्या बाजूस बळकटी येण्याकरीता सा.क्र.४ धनराज यांची साक्ष नि.क्र.२२ वर नोंदविली. यांनी त्याच्या साक्षीत ते मंडळ अधिकारी म्हणून बेनोडा येथे कार्यरत होते व दि. ०८/०७/२०१५ रोजी त्यांनी रिपोर्ट दिला होता. सदर रेती दि.२३/०६/२०१५ रोजी आरोंपीकडून जप्त केली होती. सदर जप्त रेती आरोपींनी विक्री केली होती. तहसिलदार यांनी सांगितल्या प्रमाणे सदर रेतीचे पंचनाम्याद्वारे पंचासमक्ष १३ ब्रास रेती जप्त केली होती. त्यांना रिपोर्ट व छापील प्रथम खबरी अहवाल दाखवला असता, त्यावर त्यांची सही असल्याचे सांगितले.

७. आरोपी तर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात साक्षीदाराने तहसिलदार यांनी अवैध रेती बाबत लेखी आदेश दिला होता. जप्त केलेली रेती कोणी चोरली व कोणी कोणाला विकली हे पाहिले नव्हते. सदर रेती पत्राच्या आधारे ताब्यात देण्यात आली होती. घटनास्थळी गेले असता रेती तेथे नव्हती या प्रश्नांची उत्तरे होकारार्थी व इतर सूचक प्रश्नांची उत्तरे नकारार्थी दिली.

८. सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे अवललोकन केले असता, जरी दि.२३/०७/२०१५ रोजी आरोंपीकडून रेती नायब तहसिलदार वरूड यांनी जप्त करून युवराज खंडारे यांच्या ताब्यात दिली होती. ती रेती आरोपींनी चोरून विकली असे कथन असले तरी, त्यांच्या उलटतपासामध्ये रेती कोणी चोरी केली होती व कोणाला विकली होती हे त्याने पहिले नसल्याचे मान्य केले आहे. त्यांनी नि.३१ वरील रिपोर्ट व नि.३२ वरील प्रथम खबरी अहवाल दाखल केला व त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याचे कथन केले असले तरी, तो घटनास्थळी गेला तेव्हा त्याला रेती दिसली नव्हती हे मान्य केले आहे. यावरून त्याने आरोपींना रेती चोरतांना पाहिले नसल्यामुळे त्यांच्या पुराव्यावर विश्वास ठेवून आरोपींना दोषी ठरवता येणार

नाही.

**९.** अभियोग पक्षाने सा.क्र.२ युवराज यांची साक्ष नि.क्र.२२ वर नोंदवली. त्यात त्यांनी घटना सन २०१५ मध्ये घडल्याचे सांगितले. त्यावेळी तो कोतवाल म्हणून कार्यरत होते. तो आरोपींना ओळखत असून आरोपी न्यायालयात हजर आहेत. दि.१४/०७/२०१५ रोजी पंचनामा करून रेती पडून असल्यामुळे व लक्ष ठेवण्यासाठी त्यांच्या ताब्यात दिली होती. त्यांना दि.२३/०६/२०१५ रोजीचा जप्तीनामा तसेच सुप्रतनाम्याची झेरॉक्स दाखविण्यात आली होती. त्यावर त्यांची व मंडळ अधिकारी यांची सही मान्य केली आहे. आरोपींनी एकूण १३ ब्रास रेती उचलून नेल्याचे कथन केले. त्यानंतर मंडळ अधिकाऱ्याने फिर्याद दिली होती.

**१०.** आरोपी तर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात साक्षीदाराने ही बाब मान्य केली की, पोलीसांनी त्यांना एक दोन वेळेस रेती सुपूर्द केली होती. सुपूर्द करण्याबाबत तसेच रेतीची देखभाल करण्याकरिता तहसिलदार व शासकिय लेखी आदेश नव्हता. त्यांना तोंडी आदेशावरून रेती ताब्यात दिली होती. आरोपींनी ट्रक्टरने रेतीची वाहतूक केली असल्याचे व रेती टेप लावून मोजल्याचे कथन केले होते.

**११.** सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, जरी त्यांनी त्यांच्या पुराव्यात आरोपींनी रेती उचलून नेली होती असे कथन असले, तरी सदर रेतीची देखभाल करण्याकरीता त्याला शासकिय आदेश व तसेच रेती सुपूर्द करण्याबाबतचा तहसिलदारचा लेखी आदेश नव्हता. ही बाब मान्य केलेली आहे. त्यामुळे त्याच्याकडे रेती होती किंवा कसे या बाबत संशय निर्माण होत आहे. म्हणून सदरच्या साक्षीदारावर विश्वास ठेवून आरोपीला दोषी ठरवता येणार नाही.

**१२.** अभियोग पक्षाने सा.क्र.१ संतोष यांची साक्ष नि.क्र.१८ वर नोंदवण्यात आली. त्यात त्यांनी तो आरोपींना ओळखत नसल्याचे कथन केले आहे. आरोपी तर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात साक्षीदाराने सूचक प्रश्नांची उत्तरे नकारार्थी दिली.

**१३.** अभियोग पक्षाने सा.क्र.३ कैलाश यांची साक्ष नि.क्र.२२ वर नोंदवली. त्यांनी त्यांच्या साक्षीत घटनेविषयी काहीही माहिती नसल्याचे कथन केले आहे. सदरचा साक्षीदार फितूर झाल्याने अभियोग पक्षाने न्यायालयाच्या परवानगीने उलट तपासणी स्वरुपाचे प्रश्न विचारले. त्यात त्याने सूचक प्रश्नांची उत्तरे नकारार्थी दिली आहेत.

**१५.** सा.क्र.१ संतोष व सा.क्र.३ कैलाश यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दोन्ही साक्षीदार फितूर झाल्याने त्यांची साक्ष अभियोग पक्षाकरीता काहीही महत्वाची नाही.

**१४.** सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, जरी त्यांच्या पुराव्यात त्याने जप्त केलेली एकूण १३ ब्रास रेती होती असे कथन असले तरी, सदरची रेती ही आरोपींनी चोरून विक्री केल्याचे सांगता येणार नाही. म्हणून सदर साक्षीसादारच्या पुराव्यावर विश्वास ठेवून आरोपींना दोषी ठरवता येणार नाही.

**१५**. कायद्याच्या प्रचलीत तत्वानुसार अभियोग पक्षाला आरोपींचा अपराध सर्व शंकेपलीकडे सिध्द करणे क्रमप्राप्त होते. वरील सर्व साक्षीदारांच्या पुराव्यावरून जरी अवैध रेती जप्त केली होती हे सिध्द झाले असले तरी ती रेती आरोपींनी चोरून विक्री केली होती याबाबत कोणत्याही साक्षीदाराच्या साक्षेत कथन नाही. त्यामुळे अभियोग पक्षाने सदरची १३ ब्रास रेती ही आरोपींनीच चोरुन विक्री केली होती, ही बाब संशयापलिकडे जाउन सिध्द केलेली नाही. त्यामुळे अभिलेखावर आरोपीं विरुध्द ठेवलेले दोषारोप शाबीत होण्याईतपत पुरावा उपलब्ध नसल्याने व आरोपींविरूध्द ठेवलेले दोषारोप शाबीत होत नसल्याने मुद्दा क्र.१ ला नकारार्थी उत्तर देऊन मुद्दा क्र.२ प्रमाणे खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**–:: <u>आ दे श</u> ::–**

(१) आरोपी क्र.१. **रिझवान करिम पठाण** व आरोपी क्र.२. **फिरोज खाँ चॉंद खॉ पठाण** यांना भारतीय दंड संहिताचे कलम ३७९ सह कलम ३४ खालील अपराधाच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येते.

(२) आरोपींचे बंधपत्रे व जामीनपत्रे रद्द करण्यात येते.

(३) खटल्यातील जप्त एकूण १३ ब्रास रेती ही अपील कालावधी संपल्यानंतर पुढील कार्यवाही करीता महसुल अधिकारी वरूड यांच्या ताब्यात देण्यात यावी.

(४) आरोपींनी प्रत्येकी त्यांचा जमानती मुचलका ₹ ५०,०००/– चे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) च्या पुर्तते करीता दयावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला).

**स्वाक्षरी/–**
**(आय. जे. ठाकरे)**
**सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, वरूड.**

**दि.२७/०७/२०२६**